# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## दैनंदिन प्रेस नोट दि.३१/१२/१७
## दि.३१/१२/१७ रोजी १२/०० वा.ते २०/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ४७५/१७,भादविक १४९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | विशाल चव्हाण,वय २१ वर्षे,रा.वारजे माळवाडी,पुणे |
| **आरोपी** | घनशाम घोष (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/१२/२०१७ रोजी ते १४/१२/२०१७ रोजी पर्यंत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | वर नमुद केले तारखेस यातील नमुद इसम घनशाम घोष याने फिर्यादी यांना यापुर्वी नापतोल वरुन घेतलेल्या मोबाईल फोनला ३ लाख २० हजार रु.ची लॉटरी लागली आहे. त्याची कागदपत्रे पोस्टाने पाठवली असुन त्यामध्ये मिळालेल्या कुपन मध्ये १० हजार रु.ची लॉटरी लागली आहे असे एकुण १३ लाख २० हजार रु.ची लॉटरी लागली असुन त्याचे पैसे फिर्यादी यांचे खात्यावर जमा होणेसाठी व इतर प्रोसेसिंग फी असे फिर्यादी यांचेकडुन एकुण २ लाख ४० हजार रुपये रक्कम वेळोवेळी बँक ऑफ इंडियाच्या अकाऊंटवर भरण्यास लावुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी. (गुन्हे) खांडेकर ७८८८०४२९११ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे ३६३/१७,भादविक २७९,३०४(अ), |
| **फिर्यादी** | भिकोबा देवकाते,पो.उप.निरी.बिबवेवाडी,पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | सुरज गोविंद कसबे,वय २४ वर्षे,रा.येवलेवाडी, कोंढवा,पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/१०/२०१७ रोजी २२/०० वा.चे सुमारास श्री गुरु अपार्टमेंट शेजारी गल्ली नं.३ सुखसागरनगर भाग-२ कात्रज,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद मयत इसम नामे-सुरज कसबे, याने त्याचे ताब्यातील बॉबकेट मशीन चालवीत असताना तंबाखु खावुन तंबाखु थुंकण्याकरीता वारंवार तोंड बाहेर काढत असताना त्याचे निष्काळजीपणाने मशीनचे लिव्हरला पाय लावुन सदर बॉबकेट मशीनचे वजनदार बकेट खाली सापडुन हयगयीने व निष्काजीपणे स्वतः.गंभीर जखमी होवुन स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाल आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.पी.देवकाते ९८२३०१९५१२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ५७३/१७,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | अर्जुन भापकर,वय २८ वर्षे,रा.पिसोळी गांव,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात वाहन चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/१२/२०१७ रोजी रात्रौ ०३/३५ वा.चे सुमारास बेंगलोर मुंबई हायवे रोड सवेरा हॉटेल समोर बावधान,पुणे |
| **तपशिल** | अज्ञात इसमाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे मेव्हणे नामे-सचिन सुदाम पोकळे, वय ३६ वर्षे,रा.धायरी,पुणे हे रस्ता क्रॉस करीत असताना त्यांना जबर ठोस मारून, गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | हिंजवडी पो.स्टे.प्रभारी अधिकारी २२९३२११९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**